# कपाटाकडून हार्डडिस्ककडे!

दूरचित्रवाणीच्या कार्यक्रमांचा सर्वात मोठा फायदा हा आहे की ते सुरू झाल्या झाल्या आपण हातातल्या पुस्तकाकडे वळतो आणि त्यामुळे आपले वाचन वाढते. या एका वाक्यात दूरचित्रवाणीच्या दर्जावर जशी टिप्पणी केली जाते, तशीच ती वाचण्याच्या गरजेवरही केली जाते. पुस्तकांची गरज, वाचनाची सवय आणि तरुण पिढी पुस्तके वाचत नसल्याच्या तक्रारी या सगळ्याच्या पलीकडे जाऊन आता ग्रंथ व्यवहाराकडे पाहण्याची गरज आहे. या सर्व व्यवहाराचे स्वरूप आणि ग्रंथालयांना देण्यात येणाऱ्या सरकारी अनुदानांचे गौडबंगाल याबाबत आता वेगळा विचार होण्याची आवश्यकता आहे. इंटरनेट-मुळे संदर्भासाठी ग्रंथवाचन करण्याची गरज संपली आहे. आपल्यापुढे आलेले संदर्भ पडताळून पाहण्याची कुवत निर्माण होण्यासाठी वाचन करण्याची नवी गरज निर्माण झाली आहे. येत्या सोमवारी 'जागतिक ग्रंथ दिन' आहे.



त्यानिमित्ताने ग्रंथांची बदलती संकल्पना, वाचणाच्या नव्या गरजा, साहित्याचे बदलते संदर्भ आणि भाषांच्या अस्तित्वाची नवी आव्हाने या संदर्भात या सगळ्याचा विचार आता केला पाहिजे. २३ एप्रिल, म्हणजे शेक्सपीअरच्या स्मृतीदिनी जागतिक स्तरावर ग्रंथप्रेमी हा दिवस साजरा करतात. १९९५ साली याची सुरुवात झाली, तेव्हा या दिवसाला 'ग्रंथ दिन' असे न म्हणता 'ग्रंथ आणि स्वामित्व हक्क दिवस' असे म्हटले जाऊ लागले. यावर्षी युनेस्कोने या दिवसाला 'अनुवाद दिन' म्हटले आहे. पुस्तके एका भाषेतून दुसऱ्या भाषेत जाण्याचे प्रमाण अलीकडे वाढले आहे. त्यासंदर्भात जाणिवा अधिक विस्ताराव्यात असा हेतू यामागे आहे. मराठीत अलीकडे इंग्रजी, हिंदी अथवा अन्य भारतीय भाषांमधून बरेच साहित्य अनुवाद होऊन येते आहे. परंतु मराठी साहित्यही भाषांतरित होऊन इतर भाषिकांपर्यंत पोचले, तर मराठी साहित्याचा कस लागेल आणि त्याचा वाचकही वाढेल. सध्या तरी ही प्रक्रिया बरीचशी एकाच दिशेने होताना दिसते. दुसरा महत्त्वाचा मुद्दा आहे तो ग्रंथ या संकल्पनेतील बदलाचा. नव्याकोऱ्या पुस्तकांचा स्पर्श आणि सुगंध तसेच जुन्या दुर्मिळ पुस्तकांना असलेला त्या त्या काळाचा सुगंध हा पुस्तकप्रेमींच्या जिव्हाळ्याचा विषय. ई-बूक्सच्या युगात या मनोवृत्तीतून बाहेर पडून वाचणाच्या बदलत्या स्वरूपाचा विचार केला पाहिजे. मराठी प्रकाशक अद्याप हा बदल आत्मसात करण्याबाबत उदासीन आहेत. परंतु त्यांना फार काळ यापासून लांब राहता येणार नाही. पुस्तकाची पाने उलटण्याऐवजी 'की' दाबून किंवा स्पर्श करून पुढल्या पानाकडे घेऊन जाणारी आधुनिक पुस्तके हा आपल्या पुस्तकविषयक जिव्हाळ्याचा भाग अद्याप झालेला नाही. आपला जुनाच मित्र नव्या परिवेषात समोर यावा, तसाच हा प्रकार असला तरी आपण मित्राची ही नवी ओळख स्वीकारण्याएवढे तंत्रशुद्ध आणि तंत्रमित्रही झालेलो नाही. परंतु हा काही काळ जाण्याचा प्रश्न आहे. साहित्याची व्याख्याही नव्याने करण्याची गरज या तंत्रज्ञानाने निर्माण केलेली आहे. ट्विटरवरील ४० शब्दांच्या लघुकथेपासून तर आपापल्या ब्लॉगवर वाट्टेल ते लिहिण्याची सोय झाल्याने साहित्य आणि साहित्यिक आता प्रकाशकाधीन राहिलेले नाहीत. या सगळ्या स्वयंप्रकाशित साहित्यातून चांगले ते शोधून वाचणारा नवा वर्गही तयार होतो आहे. त्यामुळे छापील पुस्तकांच्या जगात अनेकांना माहीतही नसलेले नाव वेबजगतात लोकप्रिय आहे, असेही दिसून येते. एका बाजूला मराठीच्या अस्तित्वाबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत; तर दुसऱ्या बाजूला त्याच भाषेत स्वतःला व्यक्त करण्यास उत्सुक असलेल्यांची मांदियाळी वेबवर दाटलेली दिसते आहे. हे बदल झटकून न टाकता त्यातून टाकाऊ आणि टिकाऊ अशी वर्गवारी होण्याची व्यवस्था निर्माण केली पाहिजे. सरकारी व्यवस्था हा नेहमीच विच्छेदनाचा विषय असतो. महाराष्ट्रात अ, ब आणि क दर्जाची मिळून १० हजारांहून अधिक ग्रंथालये आहेत. त्यांच्या अनुदानात यावर्षी वाढही करण्यात आलेली आहे. हे अनुदान हप्त्याहप्त्यात का होईना परंतु त्यांना मिळतेच. मात्र या अनुदानातून खरेदी केल्या जाणाऱ्या पुस्तकांचा दर्जा आणि गरज याची पडताळणी करण्याची व्यवस्थाच नाही. त्यातून प्रकाशकांच्या काही वेगळ्याच टोळ्या जन्माला आल्या आहेत. सरकारी अधिकाऱ्यांशी संगनमत करून तृतीय दर्जाची पुस्तके छापली आणि विकली जातात. त्यातून अनुदानाच्या हेतूची माती होते. ग्रंथांसाठी आता कपाटांऐवजी हार्ड डिस्कची गरज भासू लागली आहे, हा बदल पचवायला हार्ड असला तरी तो पचवून आपलासा करावाच लागणार आहे.

**Maharashtra Times, Pune, April 21, 2012. Pp.12**